# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी,** मिरारोड पुर्व. ता. जि. ठाणे.

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र ०१/२२** **दिनांक: ०१.०१.२०२२**

## नववर्षाच्या पुर्वसंध्येला कायदयाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस दलाची कारवाई.

३१ डिसेंबरच्या अनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये मा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली अपर पोलीस आयुक्त, सर्व पोलीस उपआयुक्त व सर्व सहा. पोलीस आयुक्त यांचे देखरेखेखाली पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. तसेच सर्व नागरिकांनी कोविड-१९ ओमिक्रॉनच्या वाढत्या संसर्गाचा धोका लक्षात घेवून शासनाचे निर्देश व कायदयाचे पालन करावे व कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर कृत्य आढळयास पोलीस दलाकडून आवश्यक ती कठोर कारवाई केली जाईल याबाबत पोलीसांचे वतीने निर्देश देण्यात आले होते. असे असतांना देखील काहि इसमांनी दारु पिवून वाहन चालविणे, कोविड-१९ चा प्रादुर्भाव असतांना मास्क न वापरणे, सोशल डिस्टसिंगचे पालन न करणे अशा प्रकारचे गैरकृत्य केल्याने सोशल डिस्टन्सींगच्या-२६ केसेस करुन १८७०० रुपये दंड, विनामास्क फिरणाऱ्या ५६२ जणांवर कारवाई करुन १,१४,८०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच मोटार वाहन कायदयाचे विविध कलमान्वये ८८१ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून दारु पिउुन गाडी चालविणाऱ्या ३५ वाहनचालकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे. ३१ डिसेंबर व नवीन वर्षाच्या स्वागताचे अनुषंगाने नागरिकांनी जल्लोष साजरा करतांना कोणतीही अचुचित घटना घडू नये याकरिता मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने सदरील बंदोबस्त लावण्यात आला होता.